# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

-----------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ / आषाढ ९, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

-----------------------------------

### भिवंडी शहरात वीज वितरण करणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनीचे वीजदर इतर खाजगी कंपन्यांच्या तुलनेत जास्त असल्याबाबत

**(१) * ३४४३४ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरात वीज वितरण करणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनीचे वीजदर हे इतर खाजगी कंपन्याच्या तुलनेत प्रती युनिट रुपये ३ ते रुपये ७.५० इतके अधिक आकारण्यात येत असल्याने टोरेंट पॉवर कंपनीला शहरातून हटविण्यात यावे अन्यथा जनआंदोलन करू असे पॉवरलूम मजुरी बीम वीवर्स ॲण्ड ओनर्स असोसिएशनच्या नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधी व शासनाला दिलेल्या निवेदनाद्वारे दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोरेंट पॉवर कंपनीचा शासनासोबत केलेल्या कराराची मुदत दिनांक २५ जानेवारी, २०२७ रोजी संपुष्टात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील जनता टोरेंट पॉवर कंपनीच्या सेवेवर समाधानी नसून या कंपनीच्या कार्यपध्दती व दरवाढीबाबत सातत्याने आवाज उठवून शासन स्तरावर दखल घेतली जात नसल्याने जनमाणसात प्रचंड संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टोरेंट पॉवर कंपनी संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी विविध आयुधांद्वारे तसेच शासनाकडे पत्रव्यवहार करुनही शासनाकडून कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने टोरेंट पॉवर कंपनीचा करारनामा रद्द करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महावितरण कंपनीस निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे आहे.

मे. टोरेंट पॉवर लिमिटेड व महावितरण मधील भिवंडी वितरण फ्रँचाइझी करार दिनांक २५ जानेवारी, २०२७ रोजी संपुष्टात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जालना जिल्ह्यात अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीकडे कल वाढत असल्याबाबत**

**(२) * ३३६६८ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात गेल्या चार महिन्यांत १७ खूनाच्या घटना घडल्या असून, त्यातील अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये विधिसंघर्षग्रस्त बालकांचा (अल्पवयीन मुलांचा) सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परतूर, अंबड, सिरसवाडी आदी ठिकाणी अल्पवयीन मुलांकडून आई-वडील, मित्र तसेच इतर व्यक्तींच्या हत्या झाल्याच्या घटना समोर आल्या असून गुन्हेगारी टोळयांकडून अल्पवयीन मुलांचा सॉफ्ट टार्गेट म्हणून वापर केला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोशल मीडियाचा अतिवापर, हिंसक गेम्स, नशेचे व्यसन, गुन्हेगारी प्रवृत्ती, कौटुंबिक संवादाचा अभाव तसेच गुन्हेगारी टोळयांचे आकर्षण यामुळे अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीकडे कल वाढत असल्याची बाब तज्ज्ञ व पोलीस प्रशासनाने नमूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह अल्पवयीन मुलांमधील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी शाळा, पालक, पोलीस व समाज यांच्यात समन्वय साधून समुपदेशन, जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जालना जिल्ह्यात माहे जानेवारी ते माहे मे, २०२६ या कालावधीत १७ खुनाच्या घटना घडलेल्या असून त्यापैकी ०८ गुन्हयात विधिसंघर्षित बालकांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) जालना जिल्ह्यातील परतूर, अंबड व सिरसवाडी इत्यादी ठिकाणी विधिसंघर्षित बालकांकडून कौटुंबिक वादातून खुनाचे गुन्हे घडले आहेत. तथापि, याकरिता गुन्हेगारी टोळयांकडून अल्पवयीन मुलांना सॉफ्ट टार्गेट म्हणून वापर करण्यात येत असल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(३) उपरोक्त ८ प्रकरणांमध्ये प्रश्नात नमूद कारणांमुळे गुन्हे घडल्याची बाब आढळून आली असून प्रामुख्याने कौटुंबिक वादातून गुन्हे घडले आहेत. तथापि, अल्पवयीन मुले गुन्हेगारीकडे वळण्याबाबतच्या नमूद कारणांची नोंद घेऊन त्याबाबत उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) सदर गुन्ह्यांचा तपास सुरू असून तपासामध्ये सहभाग निष्पन्न झालेल्या विधिसंघर्षित बालकांना बाल न्याय मंडळा समोर हजर केले आहे.

जालना जिल्ह्यात बालकांकडून अत्याचार घडू नये म्हणून पोलीसांमार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१) जिल्हा पोलीसांकडून शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी जनजागृती कार्यक्रम, समुपदेशन सत्रे, सायबर सुरक्षा व व्यसनमुक्ती बाबत मार्गदर्शन करण्यात येते. त्यानुषंगाने, जालना जिल्ह्यात पोलीस काका/ पोलीस दीदी या उपक्रमातंर्गत विविध महाविद्यालयांमध्ये ८१ कार्यक्रम, तर जनजागृती व्हॅन व्दारे ६७ कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

२) जालना शहरातील बालकांना मैदानी खेळाकडे आकर्षित करण्याकारीता वेगवेगळया प्रकारच्या एकूण १०० स्पोर्स्ट किटचे वाटप करण्यात आले आहेत.

३) संवेदनशील भागामध्ये नियमित गस्त व प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

४) बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष बाल पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत बालकांमधील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी व त्यांना मुळ प्रवाहात आणण्यासाठी CARE (Counselling And Reformative Education) हा कार्यक्रम राबविण्यात येतो.

५) महाराष्ट्रातील निरीक्षण गृहांमध्ये विधि संघर्षग्रस्त बालकांचा व्यक्तिमत्व विकास करणे आणि त्यांना पुन्हा जबाबदार नागरिक म्हणून समाजात स्थिर होण्यास मदत करण्याच्या दृष्टिने त्यांचे संरक्षण, शिक्षण, समुपदेशन आणि पुनर्वसन यावर भर दिला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून महिलांचा छळ व धर्मांतराच्या प्रकरणांबाबत**

**(३) * ३३०१५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मानकापूर परिसरात कार्यरत असलेल्या एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालकाकडून संस्थेत कार्यरत तरुणींशी अश्लील वर्तन, लैंगिक छळ तसेच धर्मांतरासाठी सक्ती केल्याच्या आरोपांप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून संबंधित संचालकास अटक करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेच्या आड गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जात असून संस्थेतील महिला कर्मचाऱ्यांशी अश्लील चाळे करणे, कार्यालयातील सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बंद करून गैरवर्तन करणे तसेच इतर महिला कर्मचाऱ्यांशीही अयोग्य वर्तन करून त्यांचा छळ करण्यात आल्याच्या तक्रारी तपासात निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित प्रकरणात पीडित तरुणीच्या कुटुंबीयांवर धार्मिक दबाव आणणे, नमाज पठणास भाग पाडणे, विशिष्ट पोशाख परिधान करण्यासाठी सक्ती करणे तसेच धर्मांतराचा दबाव टाकल्याचे व समाजमाध्यमांवर बनावट खाते तयार करून संबंधित तरुणींच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, त्यांची वैयक्तिक माहिती गोळा करणे व मानसिक छळ केल्याचेही निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून महिलांचे शोषण, लैंगिक छळ अथवा सक्तीच्या धर्मांतरासंदर्भातील अशा स्वरूपाच्या तक्रारी मागील तीन वर्षांत शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत काय व असल्यास त्यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे,

(५) असल्यास, शिक्षण व सामाजिक कार्याच्या नावाने संस्था चालवत मागील सुमारे दहा वर्षांपासून देश-विदेशातून निधी जमा केला असून संस्थेच्या संकेतस्थळावर बँक खात्यांची माहिती देऊन निधी संकलित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह पीडित महिलांना संरक्षण व समुपदेशन उपलब्ध करून देणे तसेच राज्यातील स्वयंसेवी संस्थांच्या कार्यपद्धतीचे विशेष लेखापरीक्षण व पडताळणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

नागपूर शहरात एका स्वयंसेवी संस्थेमध्ये कार्यरत महिला कर्मचाऱ्यांचा संस्था चालकांकडून लैंगिक छळ, अश्लील वर्तन तसेच धर्मांतरासाठी सक्ती केल्याप्रकरणी मानकापूर पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे गु.र.क्र.१३५/२०२६ नुसार दि.१९.०४.२०२६ रोजी कलम ७४, ७५(२), ७८(२), २९६, ३०२(१), ३५६ (२), ३१८(२) भा. न्या. सं. सह कलम ६६ (क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीला अटक करून त्याच्याविरूध्द दि.१५.०६.२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणाच्या तपासामध्ये फिर्यादी महिला कर्मचारी हिच्या सोबत अश्लील चाळे करताना सी.सी.टी.व्ही. बंद ठेवल्याचे तपासादरम्यान निदर्शनास आले आहे. तथापि, अन्य तीन महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ केल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले नाही.

(३) सदर गुन्हयामध्ये पीडित तरूणी किंवा तिच्या कुटुंबियांवर धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचे तपासात निष्पन्न झालेले नाही, परंतु कार्यालयात काम करताना विशिष्ट पोषाख परीधान करावा यासाठी स्वयंसेवी संस्थाचालकाने सूचना दिल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच, समाजमाध्यमांवर बनावट खाते तयार करून महिला कर्मचाऱ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवल्याची व त्यांचा मानसिक छळ केल्याची बाब तपासात निष्पन्न झाली आहे.

(४) सन २०२३ ते माहे मे, २०२६ या कालावधीत राज्यातील स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून महिलांचे शोषण, लैंगिक छळाबाबत एकूण ०४ घटना व सक्तीच्या धर्मांतराबाबतची ०१ घटना घडली असून याबाबत दाखल गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

(५) नागपूर येथील उक्त संस्थेच्या संकेतस्थळावर संस्थेसाठी स्थानिक देणगीदार यांच्याकडून निधी मिळाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, परदेशातून निधी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(६) गुन्हयातील पीडित महीलेचे समुपदेशन तपासादरम्यान करण्यात आलेले आहे. तसेच संस्थेच्या बँक खात्याचे स्टेटमेंट पडताळणी करण्यात आलेले असून संस्थेच्या विरूध्द उचित कार्यवाहीसाठी धर्मादाय आयुक्त व इन्कम टॅक्स विभाग यांचेशी पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील एका फर्निचर दुकानावर गोळीबार करण्यात आल्याबाबत

**(४) * ३६८१५ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील पुनावळे परिसरात एजे फर्निचर नामक मॉलवर रात्री ९.१० वाजण्याच्या सुमारास दोन अज्ञात व्यक्तींद्वारे गोळीबार करण्यात आला असून लॉरेन्स बिष्णोई गँगने समाजमध्यमांवर पोस्ट करत सदर गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एजे फर्निचर मॉलच्या मालकाकडे मागणी केलेली खंडणीची रक्कम न मिळाल्याने सदर गोळीबार करण्यात आला असल्याचे लॉरेन्स बिष्णोई गँगने स्पष्ट केले असून मागील महिनाभराच्या काळात अशाप्रकारे इतर दोन व्यापाऱ्यांना देखील खंडणी मागण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह सदर प्रकारच्या खंडणी आणि गोळीबाराच्या घटनांमध्ये शहरातील व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर गोळीबार आणि खंडणी मागितल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि भारतीय शस्त्र अधिनियमाच्या तरतुदीखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या पोलीस ठाण्यांमध्ये तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.
(३) सदर प्रकरणी गोळीबार झाल्याप्रकरणी रावेत पोलीस ठाणे अंतर्गत नोंदविलेल्या गुरक्रं १६७/२६ च्या तपासात एकूण १२ आरोपींचे नावे निष्पन्न झाले असून, त्यापैकी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर, इतर आरोपींचा शोध पथकाद्वारे सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या चार आरोपींकडून दोन लोखंडी पिस्टल, राऊंड व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याशिवाय, सदर प्रकरणी नमूद गुन्हयात मकोका अंतर्गत देखील कारवाई करण्यात आलेली आहे. तर, इतर दोन व्यापाऱ्यांना खंडणी मागितल्याप्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस ठाणे येथे गु. र. नं. ४६/२०२६ आणि दिघी पोलीस ठाणे गु. र. नं. २२२/२०२६ भारतीय न्याय संहिता खाली गुन्हे दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

याशिवाय, खंडणी मागितलेल्या व्यापाऱ्यांना योग्य ते पोलीस संरक्षण देण्यात आले आहे. तसेच, पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पेट्रोलिंग सुरू करण्यात आलेली असून व्यापारी व नागरिक यांच्या संयुक्त बैठका आयोजित करण्यात येत आहे. साध्या वेशातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात उशीरापर्यंत ऑर्केस्ट्रा बार सुरु असल्याबाबत

**(५) * ३९०४३ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यासह भिवंडी, कल्याण, डोंबिवली शहर परिसरात रात्री उशीरापर्यंत डान्सबार आणि लेडीज बार प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सुरु असल्याचे दिनांक ८ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे परिसरात होणारा गोंधळ, वाहतुक कोंडी, मद्यधुंद ग्राहकांचा त्रास आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत चालले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यामधील अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ अंतर्गत ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत एकही ध्वनीमुद्रीत संगीतावरील नृत्य परवाना देण्यात आलेला नाही.

तथापि, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३३ नुसार गठित सार्वजनिक मनोरंजन नियमावलीनुसार, ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत परवानाधारक ऑर्केस्ट्रा बार आस्थापनांनी परवाना नियमांचे उल्लंघन केल्याने माहे जानेवारी, २०२६ ते दिनांक १२ जून, २०२६ या कालावधीत एकूण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उपरोक्त १८ गुन्ह्यांपैकी एकूण ९ गुन्ह्यांमध्ये मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले असून, उर्वरित ९ गुन्हे पोलीस तपासावर आहेत.

पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या परिक्षेत्रातील ऑर्केस्ट्रा आस्थापना विहित वेळेत बंद करण्यासाठी रात्रौगस्त अधिकारी, प्रत्येक पोलीस स्टेशनचे बिट मार्शल हे वेळोवेळी सदर आस्थापनांना भेटी देतात. सदर आस्थापनेने कोणत्याही अटी वा शर्तींचे उल्लंघन केल्यास त्वरीत कायदेशीर कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अनेक उद्योगांनी उभारलेल्या सोलर प्रकल्पांवरील गुंतवणूक धोक्यात आल्याबाबत

**(६) * ३६३३४ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने सोलर प्रकल्पांच्या ‘बँकिंग’ नियमांमध्ये केलेल्या बदलांमुळे पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अनेक उद्योगांनी उभारलेल्या सोलर प्रकल्पांवरील सुमारे ७०० कोटी रुपयांची गुंतवणूक धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित निर्णयामुळे उद्योगांनी पूर्वीच्या नियमांनुसार कर्ज घेऊन सोलर प्रकल्प उभारले असताना नवीन नियम लागू केल्याने उद्योगांवर आर्थिक संकट निर्माण झाले असून उक्त जिल्ह्यातील ३० बड्या उद्योजकांनी उभारलेल्या १५० मेगावॅटहून अधिक क्षमतेच्या प्रकल्पांची ग्रीडवरील बँकिंग (अतिरिक्त वीज साठवून नंतर वापरण्याची सोय) बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयोगाने अतिरिक्त वीज वापरासाठी स्वतंत्र बॅटरी स्टोरेज व्यवस्था उभारण्याच्या अटीमुळे प्रकल्पांच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून या नियमांमुळे सौर बचतीच्या भरवशावर बँकांकडून घेतलेल्या कोट्यवधींच्या कर्जाचे हप्ते थकले असून नियामक आयोगाने कोट्यवधी रुपयांच्या वसुली नोटिसा बजावल्यामुळे उद्योजकांचे खेळते भांडवल धोक्यात आले यामुळे हरित ऊर्जेसाठीच्या शासकीय धोरणांचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने प्रभावित उद्योगांना दिलासा देण्यासाठी व पूर्वीच्या अटी कायम ठेवण्यासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे पुनर्विचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. सर्व नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा. आयोगाने दि. २५ मार्च, २०२६ रोजी वीज दर आदेश जारी केले आहे. सदर वीजदर आदेशाद्वारे, ‘बँकींग’ नियम हे मा. आयोगाने जारी केलेले मुक्त प्रवेश विनियमातील नुतनशील उर्जा निर्मितीचे बँकींग संदर्भातील सुधारित विनियम २००३ शी सुसंगत, दर तटस्थ व वीज कायदयातील तत्वांशी अनुसरुन आहे, ज्यामध्ये Time of Day (ToD) नुसार, कमी शुल्क (Lower Tariff) कालावधीत बँक केलेली ऊर्जा, जास्त शुल्क (Higher Tariff) कालावधीत वापरली जाऊ शकत

नाही. तसेच, मा. आयोगाने दि. २५.०३.२०२६ च्या आदेशाद्वारे, औद्योगिक उच्चदाब व लघुदाब ग्राहकांना, आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत, आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०२९-३० या कालावधीत अनुक्रमे १ ते ८ टक्के व १ ते ३ टक्के इतकी वीजदर कपात केली आहे. तसेच, उद्योगांना सौर ऊर्जा तासांदरम्यान (०९:०० ते १७:००) लागू वीज आकाराच्या सरासरी २०% - २५% सवलत असणारे (आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३०) वीज पुरवठ्याचे वेळापत्रक (Time of Day-TOD Tariff) मंजूर केले आहे.

(२) हे खरे नाही. सद्य:स्थितीतील पूर्वी अस्तित्वात असलेल्या विनियमातील तरतुदीनुसार व केंद्र शासनाने दि. १४.०६.२०२३ रोजी जारी केलेल्या "विद्युत (ग्राहकांचे हक्क) दुरुस्ती नियम, २०२३" मधील नियम ८ (अ), तसेच मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहुवर्षीय वीजदर विनियम, २०२४ आणि मुक्त प्रदेश विनियमातील तरतुदी पूर्वीप्रमाणेच आहेत. त्यामुळे कोणतेही नवीन नियम लागू केलेले नसून, पूर्वीच्याच तरतुदींना अधोरेखित करून त्यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही. मा.आयोगाद्वारे स्वतंत्र बॅटरी स्टोरेज व्यवस्था उभारण्याबाबत कोणतेही निर्देश प्राप्त झाले नाहीत. परंतु जनसुनावणी दरम्यान औद्योगिक ग्राहकांकडून विकेंद्रित बॅटरी स्टोरेज व्यवस्था स्थापनेबाबत दिलेल्या सूचना स्वागतार्ह मानल्या आहेत. तसेच विद्यमान नवीकरणीय ऊर्जा नियमांनुसार ग्राहकांना रूफटॉप प्रणालींसोबत स्टोरेज प्रणाली बसविण्याची परवानगी आहे. मा. आयोगाच्या सुधारित Time-of-Day (TOD) संरचनेमुळे औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना ऊर्जा कमी दरात साठवून जास्त दरात वापरणे आकर्षक संधी ठरेल व जास्तीत जास्त लाभ मिळू शकतो असे जनसुनावणीत मत व्यक्त केले.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अभियोगपूर्व मंजुरीच्या प्रलंबित प्रकरणाबाबत

**(७) * ३३४४० श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा कारवाईद्वारे रंगेहात पकडलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या अनेक प्रकरणांमध्ये अभियोगपूर्व मंजुरीअभावी न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सध्या एकूण ४८९ लाचखोरीची प्रकरणे अभियोगपूर्व मंजुरीअभावी प्रलंबित असून त्यापैकी १३६ प्रकरणे ९० दिवसांच्या आतील तर ३५३ प्रकरणे तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून संबंधित विभागांकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस व गृह विभागात १०५, महसूल व वन विभागात ७०, ग्रामविकास व जिल्हा परिषद विभागात ६५, नगरविकास व महानगरपालिका विभागात ४९ तसेच शिक्षण, आरोग्य, सहकार व कृषी विभागातील अनेक प्रकरणे दीर्घकाळ मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे काय,

(४) असल्यास, सातारा जिल्ह्यातील एका निवासी नायब तहसिलदारास सन २०१२ मध्ये लाच घेताना पकडण्यात आले असून त्यांचे प्रकरण अद्याप मंजुरीअभावी प्रलंबित असताना संबंधित अधिकाऱ्यांची पदोन्नती होऊन ते तहसिलदार पदावर कार्यरत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे काय,

(५) असल्यास, कोल्हापूर, जालना, रायगड, वर्धा, धुळे, लातूर आदी जिल्ह्यांतील अनेक लाचखोरीची प्रकरणे अनेक वर्षांपासून प्रलंबित असून एसीबीने वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही संबंधित विभागांकडून निर्णय घेतला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, अभियोगपूर्व मंजुरी प्रक्रियेसाठी निश्चित कालमर्यादा ठरविणे, संबंधित विभागांकडून विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे, प्रलंबित प्रकरणांचा विशेष आढावा घेणे व मंजुरी प्रक्रियेचे ऑनलाइन परीक्षण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे काय,
(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सध्या दिनांक ३१/०५/२०२६ रोजी पर्यंत एकूण ५११ प्रकरणे सक्षम प्राधिकारी यांची अभियोगपूर्व मंजूरी मिळणेसाठी संबंधित प्रशासकीय विभागाकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी ९० दिवसाच्या आतील एकूण १११ व त्यापेक्षा जास्त कालावधीची ४०० प्रकरणे आहेत.
(३) दिनांक ३१/०५/२०२६ पर्यंत पोलीस व गृह विभागात १११, महसूल व वन विभाग-६६, ग्रामविकास व जिल्हा परिषद ७१, नगरविकास व महानगरपालिका-४४, शिक्षण-३७, आरोग्य-१४, सहकार-१२ व कृषी विभागात-१० अशी अभियोगपूर्व मंजुरीची प्रकरणे प्रलंबित आहेत.
(४) हे खरे नाही.

१) कोरेगांव पोलीस ठाणे, सातारा, येथे गु.र.नं. २४/२०१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, १३(१)(ड) सह १३ (२) प्रमाणे आलोसे, पद-कारकून, तहसिल कार्यालय, कोरेगांव, सातारा यांच्याविरुद्ध दाखल गुन्ह्यामध्ये मा. विशेष न्यायालय सातारा, यांनी दिनांक १३/१०/२०२० रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन निवासी नायब तहसिलदार, कोरेगांव तहसिल कार्यालय, सातारा यांना सदर गुन्हयामध्ये सहआरोपी करुन सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने दोषारोप पत्र दाखल करणेबाबत आदेशित केले.

२) तत्पूर्वी, तत्का. निवासी नायब तहसिलदार यांना दिनांक १३.०९.२०१९ अन्वये नायब तहसीलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गात पदोन्नती दिलेली आहे.

३) दरम्यान आलोसे, तत्कालीन निवासी नायब तहसिलदार, कोरेगांव तहसिल कार्यालय, सातारा यांनी मा. विशेष न्यायालय सातारा यांच्या आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ६७६/२०२१ अन्वये दाखल केली होती.

४) आलोसे, तत्कालीन निवासी नायब तहसिलदार, यांच्याविरुद्ध महसूल व वन विभागाने सक्षम प्राधिकारी या नात्याने दिनांक १४/१०/२०२४ च्या आदेशान्वये मा.न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी परवानगी नाकारली.

५) मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८/०३/२०२५ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीमध्ये आलोसे यांची रिट याचिका मान्य करुन मा. विशेष न्यायालय, सातारा यांचा दिनांक १३/१०/२०२० रोजीचा आदेश रद्द केला आहे.

(५) व (६) १) सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०५.०६.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत एकत्रित सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

२) अभियोगपूर्व मंजुरीच्या प्रलंबित प्रकरणाबाबत विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो.

३) तसेच अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या स्तरावरुन प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत अर्धशासकीय पत्राने संबंधित सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंब्रा-कौसा (जि.ठाणे) परिसरातील व्यापारी दुकानावरील कोयता हल्ल्याबाबत**

**(८)** * **३९०८० श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा-कौसा (जि.ठाणे) परिसरातील कादर पॅलेस मुख्य रस्त्यावरील 'न्यू सुलेमान मिठाईवाला' या दुकानात एका तरुणाने मद्यपान करुन धारदार कोयत्याने कर्मचाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केला असल्याने कर्मचारी जखमी झाल्यामुळे स्थानिक व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपीने एका नारळ विक्रेत्याकडून बळजबरीने कोयता हिसकावून हा हल्ला केल्याचे व तो तरुण चरस/अंमली पदार्थांच्या नशेत धुंद असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंब्रा-कौसा आणि परिमंडळ क्षेत्रात गेल्या काही महिन्यांत अंमली पदार्थाची विक्री व सेवन करणाऱ्यांचे बेकायदेशीर अड्डे मोठ्या प्रमाणावर वाढले असून, या नशेखोरीमुळे चोरी, जबरी चोरी, मोबाईल हिसकावणे आणि व्यापाऱ्यांना धमकावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह या परिसरातील अंमली पदार्थांचे बेकायदेशीर अड्डे समूळ नष्ट करण्यासाठी, पोलिसांची गस्त वाढविण्यासाठी आणि स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बकरी ईद सणानिमित्त मुंब्रा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंगवेळी पोलीसांना अशी गोपनीय माहिती मिळाली की, मुंब्रा येथील "न्यु सुलेमान मिठाईवाले" या दुकानामध्ये एक व्यकी त्याच्या हातात लोखंडी सुरा घेऊन आजुबाजुच्या परिसरातील लोकांना व दुकानदारांना धमकावत आहे व त्याच्या हातून दखलपात्र गुन्हा होण्याची शक्यता आहे अशी माहिती प्राप्त होताच पोलीस घटनास्थळी तात्काळ पोहोचले व संबंधितास ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादी पोलीस शिपाई यांनी दोन पंचासमक्ष पंचनामा करुन सुरा तात्काळ जप्त केला व फिर्याद दिली. त्यानुसार मुंब्रा पोलीस स्टेशन येथे दि. २४.०५.२०२६ रोजी गु. र. क्र. ८९१/२०२६ भारतीय हत्यार अधिनियम कलम ४, २५ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तथापि, उक्त नमुद घटनास्थळी मद्यपान केलेल्या तरुणाने धारदार कोयत्याने कर्मचाऱ्यांवर जीवघेणा हल्ला करुन जखमी केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले नाही.

(२) सदर आरोपीने एका नारळ विक्रेत्याकडून बळजबरीने कोयता हिसकावून हा हल्ला केल्याचे व तो तरुण चरस/अंमली पदार्थाच्या नशेत धुंद असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले नाही.

(३) व (४) मुंब्रा पोलीस ठाणे हद्दीत सन २०२५ ते माहे मे, २०२६ मध्ये अंमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्यांवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

| सन | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल (रु) |
|---|---|---|---|
| २०२५ | २८ | ५६ | ५,८१,७०,८६०/- |
| मे, २०२६ पर्यंत | ०८ | १७ | २८,३५,३५,६७५/- |

तसेच पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.२२.०८.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये अंमली पदार्थाच्या गुन्ह्याबाबत झिरो टोलरन्स पॉलिसी अंमलात आणली आहे. यान्वये अंमली पदार्थाच्या गुन्ह्यामध्ये

(एन.डी.पी.एस.ॲक्ट) अंतर्गत दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व पोलीस घटकांना देण्यात आल्या आहेत.

मुंब्रा-कौसा आणि परिमंडळ क्षेत्रात चोरी, जबरी चोरी, मोबाईल स्नॅचिंग इ. गुन्ह्याबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

माहे मे, २०२५ अखेर मुंब्रा-कौसा आणि परिमंडळ क्षेत्रात चोरीचे एकूण ६६ गुन्हे दाखल असून त्यापैकी १७ गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच माहे मे, २०२५ अखेर मुंब्रा-कौसा आणि परिमंडळ क्षेत्रात जबरी चोरीचे एकूण ०५ गुन्हे दाखल असून त्यापैकी ०५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

माहे मे, २०२६ अखेर मुंब्रा-कौसा आणि परिमंडळ क्षेत्रात चोरीचे एकूण ५४ गुन्हे दाखल असून त्यापैकी ५१ गुन्हे उघडकीस आले तसेच, माहे मे, २०२६ अखेर मुंब्रा-कौसा आणि परिमंडळ क्षेत्रात जबरी चोरीचे एकूण ०४ गुन्हे दाखल असून त्यापैकी ०४ गुन्हे उघडकीस आले तसेच, सन २०२५ ते माहे मे, २०२६ मध्ये मोबाईल स्नॅचिंग बाबत कोणताही गुन्हा मुंब्रा-कौसा आणि परिमंडळ क्षेत्रात दाखल नाही.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील मुंब्रा पोलीस ठाणे हद्दीत दररोज सायंकाळी पोलीस गस्त घालत असून अंमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता पोलीस ठाणे स्तरावर दिवसपाळी व रात्रपाळी करिता एन.डी. पी.एस. ची २ पथके तयार करण्यात आलेली आहेत. सदर गुन्ह्यात गोपनीय माहितीच्या आधारे संबंधित आरोपींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई परिसरात प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) बनावट देण्यात येत असल्याबाबत

**(९) * ३७२८६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिसरातील वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेल्या दोन निवृत्त न्यायमूर्तींच्या उच्चस्तरीय समितीने प्रत्यक्ष चाचणी न करता प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) बनावट जारी करण्यात येणाऱ्या केंद्रांकडे विचारणा करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीयूसी केंद्रांचे परवाने रद्द करुन बनावट पीयूसी प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने वाहनांची प्रत्यक्ष चाचणी केल्यावरच पीयूसी प्रमाणपत्र दिले जावे यासाठी 'विशेष डिजिटल यंत्रणा' किंवा कठोर तपासणी मोहीम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) मुंबई महानगर क्षेत्रातील होणाऱ्या प्रदूषणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुमोटो जनहित याचिका क्रमांक ०३/२०२३ दाखल आहे. सदर प्रकरणामध्ये मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार २ सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीच्या दिनांक २३.०२.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व पीयूसी केंद्रांची विशेष तपासणी मोहिम राबवून तपासणीदरम्यान बनावट प्रमाणपत्र जारी करीत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ मोटार वाहन अधिनियमातील तरतूदींनुसार कारवाई करण्याचे आदेश

दिनांक ०८.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देण्यात आले आहेत. सदर विशेष तपासणी मोहिमेदरम्यान प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य, पश्चिम, पूर्व), बोरीवली यांच्या कार्यक्षेत्रामध्ये पीयुसी केंद्राद्वारे बोगस पीयुसी प्रमाणपत्र जारी केल्याचे आढळून आले नाही.

केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशानुसार NIC कडून PUC २.० ही प्रणाली विकसित करण्यात आली असून यामध्ये PUC काढताना वाहनाचे छायाचित्र व ५ सेकंदाचे चित्रीकरण घेणे बंधनकारक आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य, पश्चिम, पूर्व), बोरीवली या कार्यालयातील वायुवेग पथकांद्वारे वायू प्रदूषण केंद्रांची तपासणी करण्यात येते. दोषी आढळणाऱ्या वायू प्रदूषण केंद्रावर मोटार वाहन अधिनियम व नियमातंर्गत कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील पूर्णगड व मेर्वी पंचक्रोशीत प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्पाबाबत**

**(१०) * ३८६६१ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनामार्फत रत्नागिरी तालुक्यातील पूर्णगड व मेर्वी पंचक्रोशीत तसेच बारसू आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथे नवीन अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे दिनांक २५ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांच्या उभारणीसाठी केंद्र शासनाने अदानी आणि रिलायन्स समुह नामांकित खाजगी उद्योग समुहांसोबत सामंजस्य करार केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावित प्रकल्पांमुळे पूर्णगड व मेर्वी पंचक्रोशीतील आंबा-काजू बागायती, भातशेती आणि स्थानिक मच्छिमारी व्यवसाय पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन पर्यावरण व रोजगारावर परिणाम होणार असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी या प्रकल्पाविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून कोकणातील पर्यावरण, शेती व मच्छिमारीचे रक्षण करण्यासाठी तसेच ग्रामस्थांमधील विनाशकारी प्रकल्पाबाबत असंतोष पहाता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यात अणुऊर्जा वीज प्रकल्प स्थापन करणेबाबत राज्य शासनस्तरावर अदानी, रिलायन्स व एनटीपीसी या उद्योग समुहांसोबत सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत.

(३) राज्यामध्ये अणु वीज प्रकल्पासाठी कोणतीही जागा/ स्थळ अंतिमत: निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच, जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार स्थानिक ग्रामस्थांकडून आंदोलनाबाबतचे कोणतेही निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील खाजगी कोचिंग क्लासेस मार्फत होणारा गैरकारभार रोखण्याबाबत**

**(११) * ३८६१५ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाज्योती, बार्टी, सारथी, आर्टी, अमृत या संस्थेच्या माध्यमातून मराठा, इतर मागासवर्गीय, भटके विमुक्त जाती-जमाती, अनुसूचित जाती-जमाती, आर्थिक मागास प्रवर्ग या समाज घटकातील विद्यार्थ्यांचे प्रशासनातील व उच्च शिक्षणातील प्रमाण वाढावे म्हणून UPSC, MPSC, IBPS, SET-NET, JEE-NEET, SSC, पोलीस भरती, मिलिटरी भरती अशा विविध परीक्षांसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण हजारो विद्यार्थ्यांना दरवर्षी मोफत दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबिवण्यासाठी खाजगी कोचिंग संस्थांना शेकडो कोटींची कंत्राटे देण्यात आली असून ज्या खाजगी कोचिंग संस्थांना कंत्राटे देण्यात आली आहेत त्या संस्था या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करत आहेत तसेच विद्यार्थी संबंधित कोचिंग संस्थेत उपलब्ध नसताना देखील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांची बनावट उपस्थिती दाखवून शेकडो कोटी निधीचा अपहार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी संस्था वरील कंत्राट प्रक्रियेमध्ये पात्र ठरण्यासाठी बनावट कागदपत्रे देऊन शासनाची दिशाभूल करित असून कंत्राट मिळालेली संस्था व प्रत्यक्षात प्रशिक्षण देत असलेली संस्था यामध्ये तफावत असल्याचे देखील दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनेक खाजगी संस्थाचालक आपल्या संस्थेस वरील संस्थांचे कंत्राट मिळण्यासाठी राजकीय कार्यकर्ते व विद्यार्थी संघटनांचा वापर करून वरील संस्थांच्या संचालकांवर व अधिकाऱ्यांवर दबाव आणत आहेत, तसेच कंत्राट मिळालेल्या संस्थांच्या माध्यमातून आवश्यकतेपेक्षा जास्तीचे शुल्क आकारून शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने खाजगी कोचिंग क्लासेस मार्फत होणारा गैरकारभार रोखण्यासह संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाज्योती, बार्टी, आर्टी व सारथी या संस्थांमार्फत विद्यार्थ्यांना विविध नमूद प्रशिक्षण योजनांचा लाभ देण्यात येतो. तथापि, अमृत या संस्थेमार्फत सदर प्रशिक्षण दिले जात नाही.
(२) हे खरे नाही.

महाज्योती, बार्टी, सारथी मार्फत विद्यार्थी उपस्थिती Biometric Machine द्वारे नोंदविण्यात येते. तसेच प्रशिक्षण संस्थेला त्यांच्याकडील प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणातच प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

महाज्योती संस्थेमार्फत वेळोवेळी विदयार्थ्याची हजेरी तपासणी करण्यात येते. निवड झालेले प्रशिक्षणार्थी अनियमितपणे उपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करुन त्याऐवजी पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची निवड करुन प्रशिक्षणाचा लाभ देण्यात येतो.

तथापि, बार्टी संस्थेमध्ये विदयार्थी संघटनेकडून हजेरीबाबतच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून खुलासा मागविण्यात आला असून चौकशी समितीच्या निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

निविदा प्रक्रिया / स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रकिया राबवून प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येते. त्यामुळे कंत्राट मिळालेली संस्था व प्रशिक्षण देत असलेली संस्था यामध्ये तफ़ावत असल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) हे खरे नाही.

ज्या निविदाधारकाचे दर सर्वात कमी (L१) असतात त्यांची निवड करण्यात येते. त्यानुसारच प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

(५) महाज्योती, बार्टी, आर्टी, अमृत या संस्थांबाबत सदर प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, सारथी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (न्यायिक सेवा) या उपक्रमासाठी नाम निर्दिष्ट संस्था संकल्प एज्युकेशन प्रा. लि. या संस्थेच्या हजेरीमधील तफावतीबाबत प्राप्त अहवालानुसार सदरील संस्थेचे नामनिर्देशन या उपक्रमासाठी रद्द करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात जनगणना प्रक्रियेसाठी तांत्रिक सुविधा व साधने उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) * ३४७२२ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनगणना प्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या मोबाईल ॲपसाठी अँड्रॉइड-१२ ही किमान अट अनिवार्य करण्यात आल्यामुळे अनेक शिक्षकांचे मोबाईल निष्क्रिय ठरत असून नवीन मोबाईल खरेदी करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनगणना ही शासनाची अधिकृत जबाबदारी असूनही त्यासाठी आवश्यक साधनसामग्री (मोबाईल, इंटरनेट, उपकरणे) उपलब्ध करून न देता शिक्षकांवरच आर्थिक बोजा वाढत असून ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातील शिक्षकांनाही या तांत्रिक अटींमुळे आर्थिक ताण सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांवर उन्हाळी सुट्टीत अतिरिक्त कामाचा ताण, क्षेत्रीय सर्वेक्षण व तांत्रिक कामकाजाचा भार वाढत असल्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असून जनगणना प्रक्रियेसाठी आवश्यक तांत्रिक सुविधा व साधने उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने तांत्रिक बाबी तसेच शिक्षकांच्या शैक्षणिक कामकाजावर होणाऱ्या परिणामांवर उपाययोजना करण्यासह कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने दि.२४.१२.२०२५ च्या परिपत्रकाव्दारे जनगणना-२०२७ चा पहिल्या टप्पात घर यादी व घर गणनेअंतर्गत प्रगणक व पर्यवेक्षक हे माहिती संकलनाचे कार्य हे प्रथमच डिजीटल माध्यमातून करतील असे जाहीर केले आहे. त्यानुसार प्रगणक जनगणना संबंधित कामकाजासाठी स्वतःच्या मोबाईल उपकरणांचा वापर करतील. अपवादात्मक परिस्थितीत भौतिक प्रपत्रामध्ये माहिती जमा करून, सदर माहिती जनगणना देखभाल व्यवस्थापन प्रणाली (CMMS) पोर्टलद्वारे भरण्याकरिता चार्ज अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. राज्यातील पहिल्या टप्प्यातील जनगणनेचे कामकाज दिनांक १६ मे,२०२६ ते १४ जून,२०२६ या कालावधीत पार पडले असून माहिती संकलनाचे पूर्ण कामकाज १०० टक्के डिजीटल पध्दतीने पूर्ण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

जनगणना-२०२७ च्या कामकाजासाठी प्रत्येक प्रगणकास घर यादी व घर गणनेच्या माहिती संकलनाचे कार्य मोबाईल उपकरणांद्वारे अथवा अपवादात्मक परिस्थितीत भौतिक प्रपत्राव्दारे पूर्ण करावयाचे आहे. पहिल्या टप्प्यातील कामकाज पूर्ण केल्यानंतर प्रगणकास रु. ९,०००/- इतके मानधन देण्यात येणार आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

जनगणना-२०२७ मध्ये प्रथमच डिजिटल माध्यमाद्वारे म्हणजेच माहिती संकलन मोबाईल ॲपद्वारे व क्षेत्रीय कार्याचे संनियंत्रण जनगणना देखरेख व व्यवस्थापन प्रणाली (CMMS) पोर्टलद्वारे करण्यात येत आहे जेणेकरून क्षेत्रीय कार्य, माहिती संकलन व संनियंत्रण हे सुलभ व अधिक प्रभावीपणे करता येऊ शकेल. घर यादी व घर गणनेच्या ३० दिवसाच्या कालावधीत प्रत्येक प्रगणकास सुमारे १८०-२०० गणना घरांच्या माहिती संकलनाचे कार्य करावयाचे आहे. जे प्रति दिवस २ तासांच्या क्षेत्र भेटीमध्ये १० घरांचे गणना कार्य पूर्ण केल्यासही विहित वेळेत पूर्ण करता येणे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील श्रीमलंग परिसरातील विदयुत रोहित्रे नादुरुस्त असल्याबाबत

**(१३) * ३६५८१ श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील श्रीमलंग परिसरातील जुने व जीर्ण झालेले विदयुत पोल, जुन्या व जीर्ण झालेल्या विदयुत एलटी वाहिन्या, विदयुत रोहित्रे नादुरुस्त झालेली असल्याने वारंवार विदयुत पुरवठा खंडीत तर कधी कमी दाबाने होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या आलेल्या तक्रारीनुसार राज्यमंत्री ऊर्जा यांच्याकडे माहे जुलै, २०२६ मध्ये पत्रव्यवहार करुन सदर जुने व जीर्ण झालेले विदयुत पोल, एलटी वाहिन्या, रोहित्र तात्काळ बदलून जास्त क्षमतेचे विदयुत रोहित्रे बसविणे, वाहिन्या नव्याने टाकणे इत्यादी संदर्भात मागणी करुनही अदयाप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी तात्काळ विदयुत पोल, एलटी वाहिन्या, रोहित्रे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी १०० के.व्ही.ए. क्षमतेचे एक रोहित्र नादुरुस्त झाले होते व ते तात्काळ बदलण्यात आले. श्रीमलंग परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाल्यास महावितरण कर्मचारी तसेच सुचीबध्द कंत्राटदार यांचेमार्फत तात्काळ दुरुस्ती करुन विद्युतपुरवठा सुरळीत केला जातो.

(२) हे खरे नाही.

तथापि, जिल्हा नियोजन समिती (DPDC) मधून महावितरण कंपनीने प्रस्तावित केलेल्या कामांना आवश्यक निधी मंजूर करुन देण्याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक ११.०२.२०२६ रोजीचे पत्र महावितरण कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(३) देखभाल दुरुस्ती योजने अंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये श्रीमलंग भागामध्ये ५३ जीर्ण झालेले वीज खांब बदलण्यात आले आहेत व १२ रोहीत्रांच्या देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. याशिवाय सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत लघुदाब वाहिनीच्या तारा बदलून एबी (AB) केबल टाकण्याचे ३१६ कि.मी. चे काम पूर्ण करण्यात आले आहे. १२ कि.मी. लघुदाब वाहिनीच्या व ७२ कि.मी. उच्चदाब वाहिनीच्या तारा बदलून वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यात आलेले आहे. जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) अंतर्गत विद्युत वितरण प्रणालीच्या सक्षमीकरणासाठी एकूण रु. २१८.६९ लाख किंमतीची १९ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी २.० योजनेत बनावट बँक गॅरंटीद्वारे झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१४) * ३८२८७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी २.० योजनेच्या माध्यमातून मे.नेकॉप उर्जा प्रा. लि, मे.एनओपीएल प्रोजेक्ट्स प्रा. लि., मे.इंटिग्रेशन इंडक्शन पावर लि, मे.आयपीएल हिंगोली प्रा.लि. या चार बडया कंपन्यांनी वीज खरेदी करतांना बनावट बँक गँरटी सादर करुन सुमारे १२३ कोटी रुपयांची अर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पोलीसांच्या अर्थिक गुन्हे शाखेत महावितरण कंपनीने दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाच प्रकारे या आधी रु. १०० कोटीची बँक गँरटी देणाऱ्या अन्य एका कंपनीच्या विरोधात देखील माहे जानेवारी, २०२६ मध्ये गुन्हा दाखल झाला असून त्याचा तपास अर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह नुकसानीची रक्कम वसूल करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी २.० योजनेच्या माध्यमातून मे. नेकॉप उर्जा प्रा.लि., मे. एन ओ पी एल प्रोजेक्ट प्रा.लि., मे. इंटीग्रेशन इंडक्शन पॉवर प्रा.लि., मे. आयपीएल हिंगोली प्रा. लि. या चार कंपन्यांनी बनावट बँक गॅरंटी सादर करून सुमारे १११.६ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी एकूण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१) मे. इंटीग्रेशन इंडक्शन पॉवर प्रा.लि., मे. एन ओ पी एल प्रोजेक्ट प्रा.लि, मे. आयपीएल हिंगोली प्रा.लि. या कंपन्यांनी रु.१३.६५ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली असल्याने सदर कंपन्यांविरुध्द आ.गु.शा., गु.र.क्र. ३०/२०२६ (निर्मलनगर पोलीस ठाणे गु.र.क्र. १२७/२०२६) येथे दि. २०.०२.२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३४१(१), ३४१(४), ६१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२) मे. नेकॉफ उर्जा प्रा.लि. या कंपनीने रु.४८.४५ कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याने सदर कंपनीविरुध्द आ.गु.वि., मुंबई, गु. र. क्र.३२/२०२६ (निर्मल नगर पो. ठाणे गु.र. क्र.१२९/२०२६) येथे दि.२०.०२.२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१८(४), ३१९(२), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३) मे. नेकॉफ उर्जा प्रा.लि. या कंपनीने रु.४९.५० कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याने दि.२०.०२.२०२६ रोजी सदर कंपनीविरुध्द आ.गु.वि.गु.नों.क्र. ३३/२०२६, (निर्मलनगर पोलीस ठाणे गु.र.क्र. १३०/२०२६) भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१८(४), ३३६(२), ३६(३), ३३८, ३४०(२), ३४१(१), ३४१(४), ६१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) यापूर्वी रु. ९९.५० कोटीची बॅक गॅरंटी देणाऱ्या मे. ओम यश सि.जे.आर. लामाट विया प्रोजेक्टस् प्रा.लि. या कंपनी विरुध्द आ.गु.वि., मुंबई, गु.र.क्र. ०९/२०२६ (निर्मलनगर पोलीस ठाणे, गु.र.क्र. ३९/२०२६) येथे दि.१०.०१.२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) उक्त प्रकरणी दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

१) आ.गु.शा., गु.र.क्र. ३०/२०२६ मध्ये फिर्यादींनी दिलेल्या जबाबानुसार मे.आयआयपीएल या कंपनीने दि.०१.०६.२०२६ रोजी ७.१० कोटी व दि.०५.०६.२०२६ रोजी ६.५५ कोटी रुपयांची अद्ययावत व वैध बँक गॅरंटी सादर केली आहे. या बँक गॅरंटी महावितरणकडून दि.०९.०६.२०२६ रोजी लाभार्थी बँकेकडून तपासण्यात आल्या आहेत. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

२) आ.गु.वि., मुंबई येथे दाखल गु. र. क्र.३२/२०२६ मध्ये मे. नेकॉफ उर्जा प्रा.लि. या कंपनीने रु.४८.४५ कोटी रुपयांची बँक ऑफ महाराष्ट्राची ई बैंक गॅरंटी महावितरणकडे दि. १८.०२.२०२६ रोजी सादर केल्या. त्या बँक गॅरंटी वैध असल्याची पडताळणी महावितरण कंपनीने केली असून दि.०४.०५.२०२६ रोजी मा.अति.मुख्य न्यायदंडाधिकारी ४७ वे न्यायालय, एस्पलेनेड, मुंबई येथे ‘क’ वर्गीकरण समरी अहवाल सादर करण्यात आला आहे.

३) आ.गु.वि., मुंबई येथे दाखल गु. र. क्र.३३/२०२६ मध्ये गैरअर्जदार कंपनीच्या वतीने वैध बँक गॅरंटी जमा केली. सदर गुन्हयाचा ‘क’ समरी अहवाल मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, ४७ वे न्यायालय, मुंबई सादर करण्यात आला आहे.

४) आ.गु.वि., मुंबई येथे दाखल गु.र.क्र. ०९/२०२६ या गुन्ह्यातील ०४ आरोपींनी मा. न्यायालयात अटकपूर्व जामीनाकरिता अर्ज केले असून सदर अर्ज मा. न्यायालयात अद्याप प्रलंबित आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

सदर बँक हमीची वैधता तपासण्यामध्ये निष्काळजीपणा केल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्यामुळे महावितरण कंपनी मधील नवीकरणीय ऊर्जा विभागात कार्यरत लेखा अधिकारी यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी करण्यात येत आहे. या प्रकाराची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महावितरण कंपनीने वित्त विभागाच्या दि.०६.०१.२०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार यापुढे महावितरणच्या सर्व निविदांशी संबंधित निविदा धारकांकडून घ्यावयाची बँक हमी ही केवळ इलेक्ट्रॉनिक बँक हमी (E-BG) स्वरूपात स्विकारण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पीएम सूर्य घर योजनेतील पात्र लाभार्थी वंचित असल्याबाबत

**(१५) * ३५३७९ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पीएम सूर्य घर योजनेतील ऑनलाईन अर्ज जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे, पोर्टलमधील त्रुटी आणि केवायसी विसंगतीमुळे हजारो पात्र अर्जदार वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक पात्रता मंजुरी, मंजूर वीजभार आणि रोहित्र क्षमतेच्या नावाने सौर प्रकल्पांना अनावश्यक विलंब व नकार दिला जात असून जागा तपासणी, अधिकाऱ्यांची अनुपस्थिती आणि तपासणी अहवाल अपलोडमधील विलंबामुळे संपूर्ण प्रक्रिया बंद होत आहे तसेच मागील वीजबिलाची थकबाकी भरल्याशिवाय ना-हरकत प्रमाणपत्र नाकारून नागरिकांना योजनेपासून दूर ठेवले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकाच अर्जासाठी वेगवेगळे निकष, अतिरिक्त कागदपत्रांची मागणी आणि मालकी नोंदीतील किरकोळ त्रुटींमुळे अर्ज मुद्दाम अडकवले जात असून वितरण कंपनी पडताळणी, बँक तपशील पडताळणी आणि आधार विसंगतीच्या कारणावरून अनुदान रोखून पात्र लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या त्रस्त केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नेट मीटर उपलब्ध नसणे, जुने मीटर न बदलणे आणि बिलिंग प्रणाली अद्ययावत न केल्यामुळे बसवलेले सौर प्रकल्प निष्क्रिय पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रणाली जोडणी करून मिळणेबाबतचा अर्ज विद्यमान ग्राहकांना केंद्र शासनाच्या pmsuryaghar.gov.in या संकेत स्थळावर करता येतो. तेथून सदर अर्ज स्वयंचलित पद्धतीने महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावर वर्ग होतो. तसेच सुलभ अर्ज प्रक्रियेंतर्गत १० किलो वॅट पर्यंत सौर ऊर्जा जोडणीस त्वरित मान्यता देण्यात येते आणि ग्राहकांनी उपलब्ध सूचीबद्ध पुरवठादारांपैकी एकाची निवड करून सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित केल्यानंतर त्वरित जोडणी देण्यात येते.
(२) हे खरे नाही.

पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत दि. १७.०६.२०२६ पर्यंत सुमारे १३.१७ लक्ष ग्राहकांचे अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १३.१२ लक्ष ग्राहकांच्या अर्जांना विनाविलंब त्वरित तांत्रिक मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाच्या सुलभ अर्ज प्रक्रियेंतर्गत प्राप्त सूचनेनुसार विद्यमान वीज ग्राहकाने त्याला मंजूर करण्यात आलेल्या भारापेक्षा जास्त क्षमतेचे सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याकरिता अर्ज केल्यास सदर ग्राहकाचा अधिकचा भार देखील त्वरित मंजूर करण्यात येतो. तसेच सौर ऊर्जा प्रणाली सूचीबद्ध पुरवठादाराकडून आस्थापित केल्यानंतर त्या संबंधीचे काम पूर्ण केल्याचा अहवाल सादर करणेकरिता महावितरण कंपनीने फेसलेस आणि पेपरलेस प्रणालीचा अवलंब केला असल्याने पारंपारिक पद्धतीने तपासणी अहवाल मंजूर करण्याचा ३०-३५ दिवसांचा कालावधी कमी होऊन ३-७ दिवस इतका झालेला आहे. मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने प्रकाशित केलेल्या ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९ अन्वये थकबाकीदार ग्राहक नक्त मापन व्यवस्थेंतर्गत वीज ग्राहक अर्ज करण्यास पात्र असणार नाहीत. असे असतांना देखील सदर योजनेंतर्गत थकबाकीदार ग्राहकांना देखील अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

परंतु अशा ग्राहकांनी सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करणेपूर्वी थकबाकी भरणा करणे अनिवार्य आहे. पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असून दि. १७.०६.२०२६ पर्यत ६.३३ लक्ष छतावरील सौर ऊर्जा प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेल्या असून आजमितीस या योजनेंतर्गत ५.५८ लक्ष ग्राहकांना एकूण रु. ४४३४.६७ कोटी इतके अनुदान प्राप्त झालेले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेकरिता विद्यमान वीज ग्राहक असणे, घरगुती कारणाकरिता वीज वापर असणे हाच निकष पाळण्यात येत आहे, तसेच सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित केल्यानंतर पुरवठादाराकडून सादर करावयाची आवश्यक कागदपत्रांची यादी महावितरणच्या संकेत स्थळावर ठेवण्यात आलेली आहे. त्याव्यतिरिक्त इतर कुठल्याही कागदपत्रांची मागणी केली जात नाही. तसेच बँक तपशील पडताळणी आणि आधार विसंगती इत्यादी बाबी महावितरण कंपनीच्या अखत्यारीत येत नसून सदरच्या बाबी REC (Rural Electrification Corporation) मार्फत तपासल्या जातात.

(४) हे खरे नाही.

सौर उर्जा प्रणाली उभारून त्यास जोडणी मिळणेकामी ग्राहकांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर महावितरणतर्फे नेट मीटर विनाविलंब लावण्यात येत आहेत आणि ते मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. नेट मीटर लावल्यानंतर त्वरित बिलिंग प्रणालीमध्ये अद्ययावत केले जातात.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील हिरकणी कक्षात सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१६) * ३७१३६ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, परंडा (धाराशिव) येथे एकूण दहा राज्य परीवहन मंडळाचे बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि शासकीय कार्यालयात गर्भवती महिला व स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध नसून हिरकणी कक्ष बंद असल्यामुळे तसेच अनेक कक्षामध्ये अडगळीचे साहित्य ठेवले असल्याचे दिनांक १४ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने हिरकणी कक्षात आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन पुन:श्च सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२), (३) व (४) रा. प. सांगली विभागातील ९ बस स्थानकावर हिरकणी कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून सुस्थितीत आहेत. तसेच धाराशिव विभागातील परंडा बसस्थानकवर हिरकणी कक्षाची सोय उपलब्ध आहे. तसेच पोलीस अधिक्षक कार्यालय, सांगली यांचे अधिनस्त जिल्हा व तालुकास्तरीय कार्यालयांमध्ये ११ ठिकाणी हिरकणी कक्ष कार्यरत आहे.

तसेच इतर शासकीय कार्यालयांमध्ये हिरकणी कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## नागपूर येथे जामीनपात्र गुन्ह्यात पोलिसांनी केलेल्या बेकायदेशीर अटकेबाबत

**(१७) * ३२९९९ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील अंबाझरी पोलीस स्टेशनमध्ये एका ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला जामीनपात्र गुन्हे दाखल असतानाही बेकायदेशीरपणे अटक करून कोठडीत ठेवल्याची घटना माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जामीनपात्र गुन्हा असताना पोलिसांनी केलेली अटक ही बेकायदेशीर ठरवून उच्च न्यायालयाने संबंधित पीडित व्यक्तीला रु. २५ हजार इतकी नुकसान भरपाई देण्याचे आदेश शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले असून अटकेपूर्वी नोटीस न देताच थेट अटक केल्यामुळे पीडित व्यक्तीच्या कलम २१ अंतर्गत असलेल्या मुलभूत अधिकारावर गदा आली आहे असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह जेष्ठ नागरिकाला नुकसान भरपाई देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहरांतर्गत पोलीस ठाणे अंबाझरी येथे भादंवि, कलम ३५४(अ), २९४, ५०४, ५०६, ४२७ अन्वये दि.११.०१.२०२३ रोजी संबंधित जेष्ठ नागरिकाविरुद्ध गुन्हा क्र. १४/२०२३ दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१(अ)(१) अन्वये समजपत्र देण्यात आले होते. परंतु, सदर आरोपी तपासात कोणत्याही प्रकारचे सहकार्य करत नसल्याने गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने आरोपीस दि. १२.०१.२०२३ रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर संबंधित अटक आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन त्यास मा. न्यायालयात लगेच हजर करण्यात आले. मा.न्यायालयाने आरोपीला जामीनावर सोडले आहे.

या अटकेबाबत आरोपीने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या फौजदारी रिट याचिका क्र. ४५४/२०२३ मध्ये पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले असून अटकपूर्व नोटीस न देता थेट अटक केल्यामुळे पीडित व्यक्तीच्या कलम २१ अंतर्गत असलेल्या मुलभूत अधिकारावर गदा आली आहे असे निरीक्षण नोंदवून पीडित व्यक्तीला २५ हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश शासनाला दिले आहेत.

(४) मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दि.०९.१०.२०२५ रोजी संबंधीत पोलीस अधिकाऱ्याची त्यांच्या नियुक्ती अधिकाऱ्याने सेवाप्रवेश नियमानुसार चौकशी करुन आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार संबंधीत पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली असून, त्यांना “ताकीद (Caution)” देण्याची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. बेकायदेशीर अटकेमुळे याचिकाकर्त्याला झालेल्या मानसिक त्रासाची दखल घेऊन मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला २५,००० रुपये नुकसानभरपाई (Compensation) देण्याच्या आदेशाच्या अनुषंगाने नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (दीपनगर) (जि.जळगाव) येथील औष्णिक वीज केंद्रामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१८)** * **३२८५५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (दीपनगर) (जि.जळगाव) येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रात इंधनासाठी असलेला निधी अन्य इतर कामांकडे वगळून तब्बल रुपये २५८ कोटी इतका गैरव्यवहार करण्यात आल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव व अप्पर मुख्य सचिव, ऊर्जा यांच्याकडे दिनांक १२ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वीज निर्मिती केंद्रात इंधनासाठी असलेला निधी इतर कारणासाठी कोणाच्या आदेशानुसार वळविण्यात आला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मा.लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

सदर निवेदनामध्ये इंधन खरेदीसाठी उपलब्ध असलेला निधी इतर कामांकडे वळविण्यात आल्याची तक्रार करण्यात आलेली आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींकडूनही इंधनाशी निगडित काही खरेदी प्रक्रियांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे महानिर्मिती कंपनीच्या मुख्यालयामार्फत कार्यकारी संचालक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात आलेली आहे.

(३) सदर निवेदनाद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये नमूद बाबींची वस्तुनिष्ठ पडताळणी तसेच, सखोल चौकशी करण्याच्या उद्देशाने, दि.०७.०४.२०२६ रोजी महानिर्मितीच्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या निर्देशानुसार कार्यकारी संचालक (सं.व सु.-२) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये तांत्रिक बाबींची तपासणी करण्यासाठी दोन मुख्य अभियंते तसेच, अधीक्षक अभियंता आणि वित्तीय बाबींची तपासणी करण्यासाठी महाव्यवस्थापक (वित्त) यांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर समितीस विनाविलंब अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. या समितीमार्फत संबंधित खरेदीची आवश्यकता, सद्य:स्थिती, खरेदी करण्यात आलेल्या सामग्रीची गुणवत्ता, तसेच, खरेदी प्रक्रिया राबविताना अवलंबिण्यात आलेली कार्यपद्धती व प्रचलित नियम, अटी व तरतुदींचे पालन यांची सविस्तर तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीमध्ये (महावितरण) निवड झालेल्या मराठा उमेदवारांना अद्याप नियुक्त्या देण्यात न आल्याबाबत

**(१९) * ३३६५३ श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीच्या (महावितरण) सन २०२३ मध्ये ५३०० विद्युत सहाय्यक भरती प्रक्रियेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटका (EWS) मधून निवड झालेल्या मराठा समाजातील उमेदवारांना अद्याप नियुक्त्या देण्यात आल्या नसल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा समाजातील उमेदवारांना अद्याप नियुक्त्या देण्यात न आल्यामुळे मराठा उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटका मधून किंवा अधिसंख्य पदे निर्माण करुन व अन्य पर्याय वापरुन नियुक्त्या द्याव्यात या मागणीसाठी आझाद मैदानात निवड न झालेल्या उमेदवारांनी दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी पासून आंदोलन सुरु केले असून सदर आंदोलन अद्यापही कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांकडे याबाबतची नस्ती पाठविली असल्याने निर्णय त्यानंतर होईल असे ऊर्जा राज्यमंत्री यांनी दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी सांगितले असून अद्याप निर्णय झाला नसल्याने नियुक्त्या कधी होणार असा प्रश्न मराठा समाज उमेदवारांसमोर निर्माण झाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, विदयुत सहाय्यक भरती महावितरण मधील मराठा समाजातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) विकल्प दिलेल्या प्रवर्गातील उमेदवारांची अधिसंख्य २८२ पदांची यादी लावण्यात आली होती त्या अधिसंख्य पदांची प्रतीक्षा यादी प्रसिध्द करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सन २०२३ च्या विद्युत सहायक पदाच्या जाहिरातीच्या वेळी SEBC आरक्षण नव्हते. त्यामुळे सन २०२३ च्या जाहिरातीच्या अनुषंगाने मराठा समाजाच्या उमेदवारांनी EWS मधून अर्ज सादर केले. तद्नंतर मराठा समाजासाठी SEBC आरक्षण दि.२६.०२.२०२४ रोजी लागू झाले. त्यानुसार सदर जाहिरातीमध्ये SEBC प्रवर्गामध्ये ५१० पदे आरक्षित होती. त्यामुळे EWS प्रवर्गामधून अर्ज सादर केलेल्या मराठा उमेदवारांना SEBC किंवा खुल्या प्रवर्गातून अर्ज सादर करण्याचा विकल्प देण्यात आला. त्यासाठी पुरेशा संधी व कालावधी देण्यात आला. पात्र असलेल्या सर्व उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.
(४) व (५) हे खरे आहे. विद्युत सहाय्यक या पदाकरीता महावितरण जाहिरात क्र. ०४/२०१९ अन्वये सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये एस.ई.बी.सी. व ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गाकरीता राखीव पदांचा समावेश होता. तद्नंतर सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २३/१२/२०२०, दि. १०/०२/२०२१ व दि. ३१/०५/२०२१ अन्वये एस.ई.बी.सी. प्रवर्गातून अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना खुला अथवा ई.डब्ल्यू.एस. यापैकी ज्या प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे त्याकरीता विकल्प उपलब्ध करून दिला होता.

या दरम्यान उपरोक्त शासन निर्णयाविरूद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे काही उमेदवारांनी रिट याचिका दाखल केली. याचिकेवर मा. न्यायालयाने सदर शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही असा निर्णय दिलेला होता. त्याविरुध्द महावितरण कंपनीने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर विशेष अनुमती याचिका खारीज केली. त्यानुसार, सदर पदाचा निकाल सुधारीत करण्यात आला. त्यामुळे एस.ई.बी.सी मधून ई.डब्ल्यू.एस विकल्प दिलेले काही उमेदवार निवड यादीतून बाहेर पडले होते. सदर उमेदवारांसाठी शासन पत्र दि. ०१/०३/२०२४ अन्वये "एक विशेष बाब" म्हणून अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबतचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार, २८२ उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करून पात्र उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. जाहिरातीच्या अनुषंगाने निवड यादी व प्रतिक्षा यादी

पूर्णपणे कार्यान्वित करुन भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे सदर उमेदवारांची कोणतीही प्रतिक्षा यादी उपलब्ध नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे कला संचालनालयातील असिस्टंट प्रोफेसर भरतीत झालेला गैरव्यवहार

**(२०) * ३६८७५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे (MPSC) कला संचालनालयातील असिस्टंट प्रोफेसर गट 'अ' पदांसाठी केलेल्या सरळ सेवा भरतीत तब्बल ५३ अपात्र उमेदवारांची चुकीच्या पद्धतीने निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवड झालेल्या अनेक उमेदवारांनी बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर केली असून आवश्यक पदवीऐवजी (Degree) केवळ पदविका (Diploma) जोडूनही त्यांना आयोगाने अपात्र न ठरवता थेट शिफारस यादीत (Recommendation List) समाविष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, 'अर्थपूर्ण' गैरव्यवहाराविरोधात नागपूर जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (MAT) दाद मागितली असता, 'मॅट'ने संबंधित उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी एमपीएससीला उत्तर सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, 'मॅट'ने केवळ दोन आठवड्यांत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले असताना, तब्बल चार महिन्यांचा कालावधी उलटूनही आयोगाने अद्याप न्यायाधिकरणासमोर कोणतेही उत्तर सादर न करून 'मॅट'च्या आदेशांना दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

सदर भरती प्रक्रियेद्वारे शिफारस करण्यात आलेल्या एका उमेदवाराने उपयोजित कला या विषयातील पदविका धारण केली असून त्यांच्याकडे संबंधित विषयातील पदवी नाही अशी बाब निदर्शनास आली आहे.
(३) मुलाखतीस पात्र असलेल्या परंतु शासनाकडे शिफारस न झालेला उमेदवार श्री. वैभव साखरकर यांनी सदर भरतीबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल केलेल्या मूळ अर्जाबाबत न्यायाधिकरणाने पारित केलेल्या आदेशांत शासनाने तपासणी करण्याबाबत निदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने दि. १७ मार्च, २०२६ च्या शासन निर्णयान्वये कुलगुरु, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने दि. १० एप्रिल, २०२६ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. तसेच या अहवालाच्या आधारे मॅट नागपूर येथे शासनाकडून दिनांक ४ मे, २०२६ अन्वये शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) सदर प्रकरणी दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजी आयोगातर्फे मा.न्यायाधिकरणाकडे शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(५) मा.महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, नागपूर यांच्या निदेशांनुसार गठीत चौकशी समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या ५८ उमेदवारांपैकी ४१ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

उर्वरीत १७ उमेदवारांपैकी दोन उमेदवारांची दुबार शिफारस प्राप्त झाली असून दोन उमेदवारांनी रुजू होण्यात स्वारस्य नसल्याचे कळविले आहे.

एका पुरुष उमेदवाराची निवड भज-ब महिला आरक्षणातील जागेवर झाली असल्याने मा.महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणाने सदर निवड रद्द करण्याचे आदेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगास दिले आहेत. सदर आदेशांविरुद्ध महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

एक उमेदवार पदवी धारण करत नसल्याने अपात्र ठरत असून त्याबाबतची पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

तीन उमेदवारांचा "मुलाखतीसाठी पात्र" उमेदवारांच्या यादीत समावेश नसूनही त्यांची मुलाखत घेऊन शिफारस शासनास करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणाकडे दाखल मूळ अर्जांत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शपथपत्र दाखल केले आहे. तथापि, सद्यस्थितीत मा.न्यायाधिकरणाचे याबाबतचे आदेश पारित झालेले नाहीत.

उर्वरित आठ उमेदवारांच्या अनुभवाबाबत घेतलेल्या आक्षेपांबाबत संबंधितांकडून माहिती/ अभिप्राय प्राप्त करुन घेऊन व आवश्यकतेनुसार AICTE शी सल्ला मसलत करुन कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील बेकायदेशीर कॉल सेंटर, तांत्रिक गैरप्रकार व सायबर फसवणूक रोखण्याबाबत

**(२१) * ३६७६० श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील राजस्वनगर येथे 'अल्ट्रा इन्फोटेक' नावाच्या कॉल सेंटरच्या माध्यमातून परदेशातील आयटी तरुणांच्या परीक्षा बेकायदेशीररीत्या देऊन बनावट प्रमाणपत्रे मिळवून देण्याचा गैरप्रकार माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित आरोपी स्क्रीन शेअरिंग ॲप्स आणि चॅट जीपीटीसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा गैरवापर करून दुबई, कॅनडा, ऑस्ट्रेलिया येथील उमेदवारांच्या वतीने परीक्षा देत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका घरातून चालणाऱ्या या बेकायदेशीर उद्योगामुळे आयटी कंपन्यांच्या भरती व बढती प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमुळे शैक्षणिक व तांत्रिक क्षेत्रातील विश्वासार्हतेवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह अशा प्रकारचे बेकायदेशीर कॉल सेंटर, तांत्रिक गैरप्रकार आणि सायबर फसवणूक रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे ऑक्टोबर, २०२४ ते दि.१७.०४.२०२६ या कालावधीत, सोलापूर येथील HEST SOLUTION व ULTRA INFOTECH IT या नावाच्या कंपनीचे मालक व इतरांनी संगनमत करून खाजगी कंपन्यांमध्ये नोकरी/ पदोन्नतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून पैसे घेवून त्यांच्या ऐवजी ऑनलाईन परीक्षा/मुलाखती अन्य व्यक्तींकडून देण्यासाठी सिस्टीममध्ये छेडछाड केली.

तसेच, इंटरनेट व संगणकाचा वापर करुन उमेदवारांना बेकायदेशीरपणे नोकरी व पदोन्नती साठी विविध कोर्सेसचे प्रमाणपत्र मिळवून देवून विविध कंपन्यांची फसवणूक केली व त्याद्वारे स्वत:चा आर्थिक फायदा केला.

यामुळे HEST SOLUTION व ULTRA INFOTECH IT या कंपनीचे मालक व इतर ७ व्यक्तींविरुद्ध दि.१७.०४.२०२६ रोजी सोलापूर शहर सायबर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०३/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२), ६१(२), ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६, ६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर गुन्ह्यातील आरोपींने स्क्रीन शेअरिंग ॲप्स आणि चॅट जीपीटी सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा गैरवापर करुन दुबई, कॅनडा, ऑस्ट्रेलिया येथील विद्यार्थ्यांच्या वतीने परीक्षा दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(३) व (४) उपरोक्त नमूद गुन्ह्यात ८ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांच्याविरुद्ध दि.१६.०६.२०२६ रोजी मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

राज्य शासनाने सायबर फसवणुकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प महापे, नवी मुंबई येथे कार्यान्वित केला आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या क्षमतेसह कार्यरत आहेत. तसेच सदर सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे येथे कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येते.

सायबर गुन्ह्यांचे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून "सायबर जनजागृती/सायबर शिक्षण" हा सर्वात प्रभावी व मूलभूत उपाय असल्याने नागरिकांना सतत व नियमित स्वरूपात जागरूक करण्याकरीता व्हॉट्सॲपच्या माध्यमातून राज्यव्यापी सायबर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० वर तात्काळ तक्रार दाखल करण्याबाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या विविध सोशल मिडीया अकांउटद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

तसेच Twitter, Instagram, Facebook, YouTube वर सायबर गुन्हयांसदर्भात नवीन Modus Operandi बाबत घ्यायच्या काळजी बाबतची जनजागृती करण्याकरीता विविध Advisory, Graphics तयार करून प्रसारीत केले जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विनापरवाना बेकायदा शस्त्रे सापडण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(२२) * ३८३१९ ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिमहत्वाच्या व्यक्तीवर होणाऱ्या जीवघेण्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर विनापरवाना बेकायदा शस्त्रे सापडण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारे सापडलेल्या बेकायदेशीर शस्त्रांची लिलावाव्दारे विक्री करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह अशा शस्त्रांचा लिलाव न करता ती पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देणे आणि तसे करणे शक्य नसल्यास नष्ट करण्याच्या पर्यायाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात विनापरवाना बेकायदा शस्त्रे सापडण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(२), (३) व (४) बेकायदेशीर शस्त्र बाळगण्याप्रकरणी गुन्ह्यात सहभागी आरोपींना अटक करून त्यांच्याकडून बेकायदेशीर शस्त्रे व इतर मुद्देमाल जप्त करण्यात येतो.

सापडलेल्या बेकायदेशीर शस्त्रांची शस्त्र नियम २०१६ मधील नियम क्र. १०३ आणि नियम क्र. १०४ मध्ये विहीत केल्यानुसार खालीलप्रमाणे कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

शस्त्र नियम २०१६ मधील नियम क्र. १०३ (७) नुसार जप्त अवैध शस्त्रांपैकी जे शस्त्र वापरण्यायोग्य आहेत, अशा शस्त्रांबाबत सक्षम न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यावर पात्र शस्त्र परवानाधारकांना शस्त्रांची विक्री करण्याबाबत तरतूद आहे.

जप्त अवैध न वापरण्यायोग्य शस्त्रांची शस्त्र नियम २०१६ मधील नियम क्र. १०४ नुसार कायदेशीर कार्यवाही करून विल्हेवाट लावण्यात येते.

परंतु, केंद्रीय गृह मंत्रालयाच्या दि. ०४ डिसेंबर, २०१८ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जप्त करण्यात आलेली वापरण्यायोग्य शस्त्रे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मान्यतेनंतर शस्त्र व दारुगोळयाच्या साठ्यामध्ये जमा करण्याबाबत सूचना आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात इलेक्ट्रिक वाहन (EV) चार्जिंगसाठी एकच ॲप (अनुप्रयोग) सुरु करणेबाबत

**(२३) * ३६९९६ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इलेक्ट्रिक वाहन (EV) चार्जिंग साठी सध्या अनेक कंपन्यांची वेगवेगळी ॲप (अनुप्रयोग) वापरावी लागतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चार्जिंग स्टेशन ऑपरेटर चे charging point operator (CPO) स्वतःचे स्वतंत्र ॲप असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ड्रायव्हरला मोबाईल मध्ये दहा ते पंधरा वेगवेगळी ॲप डाऊनलोड करावी लागत असून ॲपमध्ये स्वतंत्र वॉलेट असते तसेच अनेकदा एका ॲप मधील पैसे दुसऱ्या स्टेशनवर चालत नाहीत ज्यामुळे अनेक वेळा डिजिटल पेमेंट करताना तांत्रिक बिघाड झाल्यास चार्जिंग थांबते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रवासादरम्यान नवीन कंपनीचे स्टेशन आल्यास पुन:श्च नाव, मोबाईल नंबर आणि बँक तपशील भरण्याबाबत गैरसोय होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, भारतात यूपीआय (UPI) प्रमाणे चार्जिंग साठी (unified energy interface (UEI) आणण्याचे प्रयत्न सुरू असून एकाच ॲपवरून सर्व कंपन्यांचे चार्जर वापरता येतील, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सध्या सार्वजनिक EV चार्जिंग सेवा विविध खाजगी व सार्वजनिक चार्ज पॉईंट ऑपरेटर्स (CPOs) मार्फत पुरविली जात असल्याने संबंधित ऑपरेटर्सकडून स्वतंत्र मोबाईल ॲप्स वापरली जातात. या चार्ज पॉईंट ऑपरेटर्सना महावितरण कंपनीकडून वीज पुरवठा करण्यात येतो. भारत सरकारने PM E-DRIVE योजनेअंतर्गत EV Public Charging Stations च्या Operational Guidelines नुसार भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (BHEL) यांना प्रकल्प अंमलबजावणी संस्था (Project Implementation Agency) म्हणून National Unified Hub आणि 'Unified Bharat E-Charge' या राष्ट्रीय मोबाईल ॲपच्या विकासाची जबाबदारी दिली आहे.
(५) इलेक्ट्रिक वाहन वापरकर्त्यांना विविध चार्ज पॉईंट ऑपरेटर्स (CPOs) यांच्या स्वतंत्र मोबाईल ॲप्सच्या वापरामुळे येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी केंद्र शासनाकडून EV चार्जिंग क्षेत्रात परस्पर सुसंगतता (Interoperability) व एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्याच्या अनुषंगाने, भारत सरकारने PM E-DRIVE योजनेअंतर्गत EV Public Charging Stations च्या Operational Guidelines नुसार भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (BHEL) यांना Project Implementation Agency म्हणून National Unified Hub आणि 'Unified Bharat E-Charge या राष्ट्रीय मोबाईल ॲपच्या विकासाची जबाबदारी दिली आहे. या माध्यमातून विविध चार्जिंग नेटवर्कचे एकत्रीकरण करून ग्राहकांना एकाच प्लॅटफॉर्मवरून चार्जर शोधणे, उपलब्धता पाहणे, स्लॉट बुकिंग आणि डिजिटल पेमेंट सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

-----------------

**राज्यात शालेय व्यवस्थापनावरील वीज देयकांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(२४) * ३७०१५ श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही शासकीय व अनुदानित शाळांना वाढत्या वीज दरांमुळे नियमितपणे वीज देयके भरण्यात आर्थिक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय व्यवस्थापनावरील वीज देयकांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी शाळांच्या इमारतीवरील छतावर, मोकळ्या जागांवर किंवा उपलब्ध शासकीय जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत शासनाची कोणती योजना कार्यान्वित आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महावितरणने नवीकरणीय ऊर्जेवर (प्रामुख्याने सौर, पवन, पंप स्टोरेज ) भर दिला असून या स्त्रोतांमधून हरित वीज स्वस्त दरात मिळणार असल्याने त्याचा लाभ कृषी, घरगुती औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना

मिळण्यासाठी वीज दरात कपात प्रस्तावित केली. त्यानुसार आयोगाने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजीच्या आदेशानुसार सन २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२६-२७ ते आर्थिक वर्ष २०२९-३० या कालावधीत सार्वजनिक सेवा (शासकीय) (शासकीय व अनुदानित शाळांना) वर्गवारीतील ग्राहकांसाठी सरासरी वीजदरात २% इतकी कपात मंजूर केली आहे. तसेच, सार्वजनिक सेवा (शासकीय) ग्राहकांसाठी टाइम ऑफ डे नुसार दिवसा केलेल्या वीज वापरावर (Solar hours) लागू वीज आकाराच्या सरासरी २०% -२५% (आर्थिक वर्ष २०२६-२७ ते आर्थिक वर्ष २०२९-३०) सवलत देण्यात आली आहे.

राज्यातील सर्व शासकीय तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची वीज देयके थकीत राहून वीज पुरवठा खंडीत होऊ नये, यासाठी अनुदानातून वीज देयकांची रक्कम भरण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

राज्यातील सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील वीजेचा पुरवठा अखंडीत रहावा, यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्तरावरुन एकत्रित रित्या वीज देयकांचा भरणा करण्यात येतो. तसेच, वीज देयकांचा भरणा विहित कालावधीत करण्यासाठी संयुक्त देयक पध्दती राबविण्यात येत आहे. निधी अभावी वीज देयकांचा भरणा झाला नाही, अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) शालेय व्यवस्थापनावरील वीज देयकांचा आर्थिक भार कमी करण्याच्या उद्देशाने पीएम सूर्य घर मुफ्त बिजली योजनेंतर्गत महाऊर्जामार्फत राज्यातील शासकीय इमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार, शालेय शिक्षण विभागाच्या एकूण १७,६१४ इमारती सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापनेसाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे आढळून आले. त्यापैकी एकूण ७१८ इमारतींना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून ७३ इमारतींवरील सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आले आहेत व उर्वरित एकूण ६४५ इमारतींवरील सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापनेची कार्यवाही सध्या प्रगतीपथावर आहे.

सदर योजना सुरू होण्यापूर्वी शालेय शिक्षण विभागाच्या एकूण ३१६ इमारतींचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिवती (जि.चंद्रपूर) येथील जनगणना शासनामार्फत करण्याबाबत

**(२५) * ३८६९१ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती तालुक्यातील (जि.चंद्रपूर) परमडोली, तांडा, कोठा, मुकादमगुडा, लेंडीजाळा, शंकरलोधी, महाराजगुडा, पद्मावती, इंदिरानगर, अंतापूर, येसापूर, नारायणगुडा, भोलापठार आणि लेंडीगुडा या १४ गावांमध्ये तेलंगण शासनाने जनगणना प्रक्रिया सुरु केली असून राज्य शासनाकडूनही या गावांत स्वतंत्र जनगणना होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही १४ गावे राज्यात असल्याचा स्पष्ट निकाल दिला होता, परंतु शासनाने त्या भागात योजना न राबविल्यामुळे व तेलंगणा शासनाने दरम्यानच्या काळात योजना राबविल्या असल्या तरी ही गावे राज्यात राहतील अशी मा.मुख्यमंत्री महोदयांनी भूमिका घेऊन गावांतील रहिवाशी हे प्रामुख्याने मराठी भाषिक असल्याचे तसेच मुकादमपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी त्याबाबत निवेदन जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना दिल्याचे दिनांक १८ मे,२०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जनगणना-२०२७ करिता चार्ज जनगणना अधिकारी म्हणून तहसिलदार, तालुका जिवती, जि.चंद्रपूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिवती तहसिलदार कार्यालयाद्वारे सदर १४ गावांमध्ये जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यांतर्गत घरयादी व घरगणनेचे क्षेत्रीय कार्य पूर्ण करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

सदर १४ गावात महाराष्ट्र शासनाच्या योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील सदर गावांची जनगणना महाराष्ट्र राज्यातून करण्याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री.रामदास गोविंद रणविर यांनी तहसिलदार, जिवती, जि.चंद्रपूर यांना निवेदन सादर केलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात पशुखाद्याच्या दरात वाढ होत असल्याबाबत**

**(२६) * ३३६८३ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या वर्षभरात पशुखाद्याच्या दरात ३५ ते ४० टक्के वाढ झाल्याचे तसेच त्या तुलनेत दूध खरेदी दर स्थिर राहिल्याने दुग्धव्यवसाय तोट्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढत्या तापमानामुळे व चाराटंचाईमुळे दूध उत्पादनात घट होत असल्यामुळे जनावरांचे पालनपोषण करणे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अवघड झाले असून पशुखाद्य दर नियंत्रण, चारा उपलब्धता वाढविणे व दूध उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील मागील ३ वर्षातील चारा उत्पादनात तसेच दुध उत्पादनात घट झालेली नाही. पशुखाद्याचे दर हे त्यात असणाऱ्या घटकाचे प्रमाण व आवश्यक कच्च्या मालाचे किंमतीवर अवलंबून असतात. तसेच मागणी व पुरवठयावर अवलंबून आहेत. चारा उत्पन्नात वाढ करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेंतर्गत चारा बियाणे वाटप, हायड्रोफोनिक तंत्राद्वारे चारा उत्पादन, मिनी टीएमआर उपकरण व मुरघास सयंत्र, कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. विकसित भारत रोजगार आणि आविजिका मिशन (ग्रामीण) VB-G RAM G २०२५ अंतर्गत जनावरांना सकस दर्जेदार व पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध व्हावा यासाठी वैरण विकासाच्या दृष्टिने रोजगार हमी योजना विभागाशी संसाधन अभिसरण (resource convergence) करण्यात येत आहे. पशुधनास चांगल्या प्रतीचे पशुखाद्य उपलब्ध व्हावे यासाठी पशुखाद्याच्या पॅकींगवर पशुखाद्यात समाविष्ट असलेल्या अन्नघटक व त्याचे प्रमाण नोंदविण्याचे शासन निर्णय दि. २२.०७.२०२४ अन्वये बंधनकारक करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय भरती प्रक्रियेत राजपत्रित व अराजपत्रित पदे विभागांतर्गत पदोन्नती किंवा प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याबाबत

**(२७)** * **३३४४१ श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय भरती प्रक्रियेत सुसूत्रता व एकरूपता आणण्यासाठी नव्याने शासन निर्णय जारी करून काही राजपत्रित व अराजपत्रित पदे थेट भरतीऐवजी विभागांतर्गत पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानुसार नामनिर्देशनाच्या कोट्यातील काही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा विभागीय भरती प्रक्रियेऐवजी पदोन्नतीद्वारे भरली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत सध्या कायदेशीर व प्रशासकीय निर्बंध असल्याने या नव्या निर्णयामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच इतर आरक्षित प्रवर्गांना विभागीय भरतीत मिळणाऱ्या आरक्षणाच्या संधींवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विभागीय पोलीस निरीक्षकांसह अनेक अराजपत्रित पदांसाठी यापूर्वी विभागीय परीक्षा व मुलाखतीद्वारे भरती केली जात होती आणि त्या प्रक्रियेत आरक्षणाची अंमलबजावणी होत होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर पदे पदोन्नतीने भरली जाणार असल्यामुळे अराजपत्रित स्तरावरील आरक्षित प्रवर्गांच्या पदोन्नतीच्या संधी कमी होतील, अशी कर्मचारी संघटना व संबंधित घटकांकडून शासनाकडे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत काय,
(६) तसेच, सदर शासन निर्णय जारी करण्यापूर्वी आरक्षणावर होणारा संभाव्य परिणाम, कायदेशीर बाबी तसेच कर्मचारी संघटनांचे मत विचारात घेण्यासाठी कोणतीही स्वतंत्र समिती अथवा अभ्यासगट नियुक्त करण्यात आला होता काय,
(७) असल्यास, आरक्षणाच्या घटनात्मक तरतुदींना बाधा न पोहोचता सर्व संवर्गांना न्याय मिळावा यासाठी सदर शासन निर्णयाचा फेरविचार करणे, आवश्यक दुरुस्त्या करणे तसेच आरक्षित प्रवर्गांच्या प्रतिनिधित्वावर परिणाम होणार नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) विभागीय भरती म्हणजेच मर्यादीत विभागीय परीक्षेद्वारे करण्यात येणारी भरती ही पदोन्नती असल्याने त्यास सध्या कायदेशीर निर्बंध आहेतच, त्यामुळे सदर शासन निर्णयामुळे मर्यादीत विभागीय भरतीत मिळणाऱ्या आरक्षणाच्या संधीवर परिणाम झालेला नाही.
(४) विभागीय पोलिस निरीक्षक असे पद शासनात अस्तित्वात नाही. गृह विभागामध्ये पोलिस उप निरीक्षक पदावरील पदोन्नतीसाठी मर्यादीत विभागीय परीक्षा घेतली जाते. या परीक्षा पद्धतीमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

(५) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(६) राज्य शासनाच्या अखत्यारितील केवळ सरळसेवेने भरण्यात येणाऱ्या पदांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा व सुसूत्रीकरण करताना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रामुख्याने विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याशी सल्लामसलत करून तसेच इतर राज्यांच्या भरतीप्रक्रियेचा अभ्यास करून राज्य शासनाच्या पदभरती प्रक्रियेत सुसूत्रीकरण करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(७) वरील अनु.क्र.६ मध्ये नमूद केल्यानुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या सहमतीने सदर निर्णय घेण्यात आला असल्याने, सदर शासन निर्णयाचा फेरविचार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात शेती पंपांसाठी सौर ऊर्जेची सक्ती रद्द करून मागणीनुसार वीज जोडणी देण्याबाबत

**(२८)** * **३७२०६ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरज पूर्व भागात भूगर्भातील पाण्याची पातळी कमालीची खालावल्यामुळे शेतकऱ्यांना ३०० ते ४०० फुटांपेक्षा जास्त खोल कूपनलिका (बोरवेल) माराव्या लागत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सौर ऊर्जा शेती पंपांची (Solar Pumps) क्षमता मर्यादित असल्याने ते २०० फुटांपेक्षा जास्त खोलीवरून पाण्याचा उपसा करू शकत नाहीत, परिणामी शेतकऱ्यांना विहिरी व कूपनलिकेत पाणी असूनही ते पिकांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सौर पंपांच्या या तांत्रिक मर्यादेमुळे ऐन पिकाच्या हंगामात पाणी उपसता येत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून या भौगोलिक व तांत्रिक अडचणींचा विचार करून सांगली जिल्ह्यातील अशा बाधित भागांत सौर ऊर्जेची सक्ती तातडीने रद्द करावी आणि शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना पारंपरिक वीज जोडणी (Electric Connection) मंजूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सांगली या विभागामार्फत भूजल पातळीचे मोजमाप करण्याकरिता मिरज तालुक्यातील पाणलोट क्षेत्र निहाय १. आरग २. बेडग ३. बेळंकी ४. सावळवाडी ५. कवलापुर ६. म्हैशाळ या गावामध्ये निरिक्षण विहीरी निवडण्यात आल्या आहेत.

सदरील निरिक्षण विहीरींच्या नोंदीनुसार माहे मे, २०२६ मधील भूजल पातळीची तुलना मागील ५ वर्षांच्या भूजल पातळीशी केली असता (-)०.९८ मी. इतकी घट आढळून आलेली आहे. शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या वापराकरीता विंधन विहीर (बोरवेल) यांची शिफारस केली जात नसून, फक्त पिण्याच्या पाण्याकरीता ६० मी. (२०० फुट) पर्यंत शिफारस करण्यात येते.
(२) हे खरे नाही. सौर कृषी पंप आस्थापित करण्याच्या ठिकाणाची लाभार्थी, महावितरण आणि पुरवठादार यांद्वारे संयुक्तरित्या सर्वेक्षण केले जाते. या सर्व्हेक्षणानुसार पंपाचा हेड म्हणजेच पंप जास्तीत जास्त किती उंचीवर पाणी उपसा करू शकतो, याचे मापन निश्चित केले जाते.

(३) व (४) हे खरे नाही. राज्यातील सर्व भागात सौर पंप आस्थापित केलेले असून, ज्या भागामध्ये तांत्रिक अडचणी किंवा आव्हाने आले, त्यावर महावितरणाने मात करून बुस्टर पद्धतीने, मोनोपोल उभारून, कॅनेल वर सौर पंप आस्थापित करून, तरंगता सौर पंप आस्थापित करून शेतीला पाणीपुरवठा केलेला आहे. तसेच हरित ऊर्जा द्वारे दिवसा पाणीपुरवठा करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.